दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/विधी/४२१/२०१९/२० दिनांक : २३/११/१९

प्रति,
मा. सदस्य सचिव
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष**

**विषय :-** राज्यस्तरीय कांदळवन संवर्धन व संरक्षण समितीच्या दि. 20/9/2019 रोजी झालेल्या बैठकीतील सुचनेनुसार केलेल्या पुर्ततेबाबतचा अहवाल.

**संदर्भ :-** 1) दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या आठव्या बैठकीचे इतिवृत्तांत
2) आपलेकडील पत्र ऑक्टो 2019, जाक्र.ल.ले/71/2019-20

**मा. महोदया,**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कांदळवनाच्या क्षेत्रात झालेल्या अतिक्रमणाबाबत तसेच मातीभरावाबाबत तक्रारदार श्री. धिरज परब व इतर यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे विविध तक्रारी अर्ज दाखल केले आहेत.

सदर तक्रारीच्या अनुशंगाने मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची आठवी बैठक घेण्यात आली होती. तसेच श्री. धिरज परब यांनी केलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील तक्रारीनुसार तहसिलदार, ठाणे यांचेमार्फत दि. 08/02/2019 व दि. 08/03/2019 रोजी कांदळवन उपसमितीच्या सदस्यांनी केलेल्या स्थळपाहाणी अहवालानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करणेकरीता संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये निर्देश देऊन व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेस विनंती केलेली आहे. तरी तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुशंगाने महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची तक्रारनिहाय माहिती सोबत जोडून देत आहे.

आपला,
**बालाजी खतगावकर**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
13/11/19

**तक्रार क्र. 40 :-** तक्रारदार श्री. धिरज परब यांची दि. 28/12/2018 रोजीच्या तक्रारीअन्वये कांदळवन व नैसर्गिक पर्यावरणाचा -हास करणारा ठराव क्रमांक 65 प्रकरण क्रमांक 64 महासभा दि. 05/09/2018

**महानगरपालिकेमार्फत केलेल्या कार्यवाहीची माहिती** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवनाची सर्वेक्षण होऊन अद्यापपर्यंत कांदळवन क्षेत्र अधिसुचित करण्यात आलेले नाही. त्यामुळे कांदळवन क्षेत्र व 50 मीटर बफर झोनची हद्द निश्चित करता येत नाही. याकरीता मनपा क्षेत्रातील कांदळवन क्षेत्राचे सर्वेक्षण होऊन कांदळवन क्षेत्राची हद्द कायम करणे आवश्यक आहे. जेणेकरून कांदळवन क्षेत्राचे संरक्षण व 50 मी. बफर झोनच्या हद्दीचे अनुपालन करणे सोईचे जाईल.

वसई विरार ते मिरा भाईंदर पुढे मुंबईला जोडणारा लिंक रस्त्याच्या रूपरेषेबाबत प्रस्तावास मा. महासभेची अद्यापपर्यंत मंजुरी प्राप्त नाही. त्यामुळे प्रत्यक्ष जागेवर काम सुरू केलेले नाही. तथापि, भविष्यात सदर रस्त्याचे काम करावयाचे असल्यास घोषित होणारे कांदळवन क्षेत्र व 50 मी बफर झोनची हद्द लक्षात घेऊन सक्षम प्राधिकरणाचे पूर्व मंजुरीनेच रस्त्याचे काम करण्यात येईल.

बालाजी खतगावकर
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका